# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ३०.०४.२०२६ गुरुवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला आजीवन सश्रम कारावासाची शिक्षा :–**

दिनांक ३०.०४.२०२६ रोजी मा. ३ रे अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपुर, श्री. एस. एच. ग्वालानी साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. २५/२०२४ मधील, पोलीस ठाणे मानकापूर येथील अप. क्र. ३३२/२०२३ कलम ३०२ भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी नामे चंद्रदयाल समल मरसकोल्हे (मस्कुले) वय ३१ वर्षे, रा. शिवनी, मध्यप्रदेश ह.मु.– प्लॉट क्र. १६, मॉ बम्बलेश्वरी सोसायटी, एनआयटी गार्डन जवळ, प्रकाश नगर, मानकापूर, नागपूर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३०२ भा.दं.वि. अन्वये आजीवन सश्रम कारावासाची शिक्षा व २५,०००/– रू. दंड आणि दंड न भरल्यास सहा महिने अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक ०२.०९.२०२३ चे १७.३५ वा. चे सुमारास, वर नमुद आरोपीने घरगुती कारणावरुन त्याची पत्नी नामे बिस्तोबाई चंद्रदयाल मरसकोल्हे (मस्कुले), वय २६ वर्षे हिला जिवे ठार मारण्याचे उद्देशाने तीचे गळ्यावर चाकूने वार करुन, तिला जिवानिशी ठार केले. अशा मृतकाचा भाउ फिर्यादी नामे बिपतसिंग उर्फ शिवा ब्रिजलाल परते, वय २४ वर्षे, रा. धानोरा, मध्यप्रदेश, ह.मु.– कळमेश्वर जि. नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे मानकापूर येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक २२. ०९.२०२३ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी सपोनि. विलास पाटील यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती कल्पना पांडे यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री हेमंत झा यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. श्रीमती स्वाती बोरकर यांनी काम पाहिले.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :– घातक शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २९.०४.२०२६ चे २३.३० वा. ते २३.५० वा. चे दरम्यान, हुडकेश्वर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, गुरुदेव नगर, इंदीरा हॉस्पिटल समोर, हुडकेश्वर, नागपूर येथे एक इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, एक ईसम हातात कोयता घेवून धुमाकुळ घालताना दिसुन आला. तो पोलीसांना पाहुन पळु लागला असता त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी कोयता काढुन त्यास निशस्त्र केले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव अक्षय श्रीकांत वाटकर, वय २६ वर्षे, रा. ब्रम्हा नगर, नरसाळा रोड, नाल्याजवळ, हुडकेश्वर, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी कोयता किंमती ३००/– रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने लोखंडी कोयता घेवुन धुमधाम घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा. गणेश वामनराव बोंद्रे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. पंकज जाधव यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— फसवणूक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, सच्चिदानंद नगर, साईविष्णु अपार्टमेंट, मानेवाडा, नागपूर येथे राहणारे फिर्यादी डॉ. निखिल चंद्रकांत येवले, वय ३६ वर्षे यांनी त्यांचे मोबाईलवर इंस्टाग्रामवरील बिझनेस नेटवर्क या वेबसाईटवरील जाहीरात पाहून संपर्क केला असता, आरोपी क्र १) सुप्रिया वेंकट मेश्राम २). आकाश राजेंद्र गजबे, दोन्ही रा. प्लॉट क्र. ४०५, साईराम अपार्टमेंट, जानकी नगर, मानेवाडा, नागपूर यांचेसोबत फिर्यादी यांची ओळख झाली. आरोपींनी ते सुआ हॉटेल्स प्रायवेट लिमी. या कंपनीचे मालक असून ते डायरेक्टर आहेत व त्यांची १०० टक्के संयुक्त मालकी आहे. तसेच, त्यांची कंपनी पब, हॉटेल्स, रेस्टारेंट व बार चा व्यवसाय करतात असे फिर्यादीस सांगून, यामध्ये गुंतवणूक केल्यास अधिक नफा होईल असे खोटे आमिष दाखविले. तसेच, त्यांना कंपनीचे ३० टक्के शेअर्स विकायचे आहेत असे सांगितले. नमुद माहिती त्यांचे वेबसाईटवर सुद्धा टाकून फिर्यादी यांना गुंतवणूक करण्यास भाग पाडून, फिर्यादीकडून दिनांक ०७.०८.२०२५ ते दि. २९. ०४.२०२६ दरम्यान वेळोवेळी एकूण २९,७७,७४७/— रु. गुंतवणुकीकरीता घेतले. आरोपींनी फिर्यादी यांना कोणताही फायदा मिळवून न देता किंवा परतावा न देता, वेळोवेळी टाळाटाळ करुन, फिर्यादीची रक्कम परत न करता, त्यांचा अन्यायाने विश्वासघात करुन, फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्ज चौकशीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे सपोनि. ओमप्रकाश भलावी ९९२३१४०५६४ यांनी आरोपींविरूध्द कलम ३१८(४), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे सिताबर्डी :— चोरी करणाऱ्या अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी सौ. प्रेमिका किशोर वानखेडे, वय ३५ वर्षे, रा. कोहळी, ता. कळमेश्वर, जि. नागपूर यांचे मामेबहिणीचे हळदीचा कार्यक्रम असल्याने, त्या आपले मुलीसोबत दिनांक २९.०४.२०२६ चे १४.०० वा. चे सुमारास, सिताबर्डी लोहापूल येथे व तेथून हिंगणा येथे जाण्याकरीता ऑटोरिक्षाने मोरभवन बसस्टॉप येथे आल्या. फिर्यादी यांना पाणी प्यायचे असल्याने, त्यांनी पाणी विकत घेण्यासाठी पर्स मधून पैसे काढण्याकरीता पर्स बघीतली असता, फिर्यादीचे पर्समध्ये सोन्याचे मंगळसुत्र व सोन्याच्या दोन अंगठी असा एकूण २,२२,०००/— रु. चा मुद्देमाल दिसून आला नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नजर चूकवून फिर्यादीचे पर्समधून नमुद मुद्देमाल चोरुन नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. राहूल वंजारी ७०२८३६९३८१ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** बंडू बुधाजी डोंगरे, वय ५८ वर्षे, रा. हुडकेश्वर खुर्द, बुध्द विहार जवळ, हुडकेश्वर, नागपूर हे मागील १५ वर्षापासून मानसिक रुग्ण असून, ते दिनांक ०२.०४.२०२६ चे ०७.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता, घरून कुठेतरी निघुन गेले.

घरी परत आले नाहीत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाहीत. **वर्णन—** रंग—सावळा, चेहरा—लांबट, डोळे—काळे, बांधा—मध्यम, उंची— ५ फुट ३ इंच, केस— काळे पांढरे, अंगात— पांढरे रंगाचे फुलबाहीचे शर्ट व काळ्या रंगाचा हाफ बर्मुडा घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** तक्रारदार नामे अल्फा शहा मो.क्र. ८९२८२७३०४४ रा., हुडकेश्वर, नागपूर यांनी पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे मिसींग तक्रार दिली की, त्यांचा पाळीव श्वान नामे ग्राउछु वय अंदाजे ३ वर्ष रंग काळा, ओळखचिन्हे— तोंडाजवळ पांढरे पट्टे असलेल्या वर्णनाचा श्वान हा दिनांक १४.०२.२०२६ रोजी पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील इंसारा सिटी, पिपळा बायपास रोड येथून हरविलेला आहे. त्याचा शोध घेतला असता मिळून आलेला नाही. तरी नमुद वर्णनाचा श्वान कोणासही आढळून आल्यास त्यांनी मुळमालक यांचे भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. नमुद श्वान आणून देणाऱ्यास श्वान मालकाकडून १०,०००/—रू. रोख स्वरूपात बक्षिस जाहीर करण्यात आलेले आहे.



बंडू



श्वान— ग्राउछु

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**